कॅम्प वसमत.

दिनांक :– २५.०७.२०१९

## प्रेसनोट

**लोकसेवक श्री संजय संभाराव धाडवे, वय ४७ वर्ष, तलाठी, वर्ग–३, सज्जा कुरूंदवाडी व गिरगाव, तहसिल वसमत, जि. हिंगोली, रा. काब्रा नगर, नांदेड यांनी २,०००/–रू. ची लाच स्विकारल्यावरून त्यांना ताब्यात घेतले बाबत...**

---

पिडीत तक्रारदार यांनी दिनांक २४.०७.२०१९ रोजी तक्रार दिली होती की, त्यांचे व त्यांचे आई वडिलांचे नावे असलेल्या शेतावर असलेला बॅकेचे कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी व तक्रारदार यांनी त्यांचे शेतात लावलेल्या संत्र्यांचे झाडांची नोंद शेताचे सातबाराव घेण्यासाठी लोकसेवक धाडवे, तलाठी सज्जा कुरूंदवाडी हे २,०००/– रूपयांची लाचेची मागणी असल्याबाबत तक्रार दिली होती.

त्यावरून दिनांक २४.०७.२०१९ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यात आली असता लोकसेवक धाडवे, तलाठी, सज्जा कुरूंदवाडी यांनी तक्रारदार यांना २,०००/– रू. ची लाचेची मागणी केली होती. त्यावरून दिनांक २५.०७.२०१९ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक धाडवे, तलाठी यांनी गिरगाव – वसमत रोडवर, ३३ के.व्ही. उपकेंद्राजवळ, गिरगाव येथे तक्रारदाराकडून सकाळी ११. ३५ वाजताचे सुमारास लाचेची रक्कम स्विकारली. त्यावरून लोकसेवक धाडवे यांना लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तसेच पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी मा. श्री. संजय लाटकर, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षिका, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, पोलीस उपअधीक्षक श्री गायकवाड, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी पोहेकॉ श्री अभिमन्यु कांदे, पोहेकॉ श्री विजय कुमार उपरे, पोहेकॉ श्री आढाव, पोना श्री संतोष दुमाने, पोना महारूद्रा कबाडे, पोना श्री विनोद देशमुख, पोना श्री पंचलिंगे,पोना श्री जमीर, पोशि श्री अविनाश किर्तनकार, चापोना श्री सरनाईक अॅ. क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.**–१०६४, दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५,
**मोबाईल क्रमांक** :– ८८८८७१७९९९, ९९२३०४२५६५, ८९७७८९८८२५.

Scanned by CamScanner